# श्रीराम सहकारी साखर कारखाना लि., फलटण, जि. सातारा

## अधिमंडळाची वार्षिक साधारण सभेची नोटीस

(फक्त सभासदांकरीता)

जा.क्र.: सा.प्रशासन/७००/२०२०-२१ दिनांक : १३/०३/२०२१

स. न. वि. वि.

या सूचनेद्वारे आपणास कळविण्यात येते की, कोवीड-१९ च्या साथीच्या पार्श्वभूमीवर शासनाच्या निर्देशांचे पालन करणेकरिता, महाराष्ट्र शासन, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग यांचेकडील परिपत्रकातील निर्देशानुसार (क्र .संकीर्ण २०२०/प्र.क्र.२४/१३ -स दि. ८ मार्च २०२१) कारखान्याची सन २०१९-२० या आर्थिक वर्षाची ६५ वी अधिमंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार दि. २७/०३/२०२१ रोजी दुपारी ०१.०० वाजता व्हिडीओ कॉन्फरन्सिंग (VC) द्वारे ऑनलाईन पध्दतीने खालील विषयांचा विचार करणेसाठी मा. डॉ. श्री.बाळासाहेब पंढरीनाथ शेंडे, चेअरमन यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित केली आहे. सदर सभा व्हीडीओ कॉन्फरन्सिंग (VC) द्वारे ऑनलाईन पध्दतीने होणार असल्याने सभासदांची प्रत्यक्ष उपस्थिती अपेक्षित नाही. त्यामुळे श्रीमंत मालोजीराजे सहकारी बँक लि., मुख्य कार्यालय,फलटण,ता.फलटण,जि.सातारा हे सभास्थान मानण्यात येईल. तरी या सभेस सर्व सभासदांनी ऑनलाईन उपस्थित रहावे, ही विनंती.

## - सभेपुढील विषय -

१) दि. २९/०९/२०१९ रोजी झालेल्या ६४ व्या अधिमंडळाच्या वार्षिक साधारण सभेच्या कामकाजाचा वृत्तांत वाचून कायम करणे.

२) सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षातील संस्थेच्या कामकाजाचा संचालक मंडळाकडून आलेला अहवाल स्वीकारणे व त्याची नोंद घेणे,

३) कारखान्याचे (अर्कशाळा विभागासह) सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षातील हिशोबाचे ताळेबंद आणि नफा तोटा पत्रके दाखल करून घेणे व स्वीकारणे,

४) मा. जी. सी. गोडबोले अँड कंपनी, पुणे यांचेकडून आलेल्या सन २०१९-२० या वर्षाचा वैधानिक लेखा परिक्षण अहवालाची नोंद घेणे व सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाच्या वैधानिक लेखा परिक्षणाचा दोषदुरुस्ती अहवाल दाखल करून घेणे व स्वीकारणे.

५) सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षाकरीता मा. संचालक मंडळाने सादर केलेल्या अंदाज पत्रकाची तसेच निधी उभारणीकरीता सुचविलेल्या उपाय योजनांची नोंद घेणे आणि २०१९-२०२० या वर्षातील अंदाजपत्रकापेक्षा कमी / अधिक झालेल्या खर्चाची नोंद घेत मंजूरी देणे.

६) सन २०२०.२१ या आर्थिक वर्षाचे लेखा परिक्षण करण्याकरिता शासनमान्य लेखा परिक्षकांच्या नामतालिकेमधून वैधानिक लेखा परिक्षकांचे केलेल्या नियुक्तीस मान्यता देणे.

७) अधिमंडळाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेसाठी अनुपस्थित सभासदांची रजा क्षमापीत करण्याबाबत निर्णय घेणे.

८) मा. अध्यक्षांचे पूर्व परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयांवर विचार करणे.

मा. संचालक मंडळाचे आदेशानुसार

स्थळ : फलटण **चंद्रकांत दिनकर तळेकर**

दिनांक : १३/०३/२०२१ कार्यकारी संचालक

सूचना

१. गणपूर्ती ( कोरम ) अभावी सभा तहकूब झाल्यास सभा ऑनलाईन पध्दतीने, त्याच दिवशी अर्ध्या तासाने ऑनलाईन आयोजित केली जाईल व त्या सभेस गणसंख्येचे (कोरम) बंधन असणार नाही. सभेच्या ठरलेल्या वेळेस, जेवढे सभासद कारखान्याने या सभेसाठी पाठविलेल्या अधिकृत लिंकवर जावून सभेस उपस्थित राहातील, त्यांची उपस्थिती गणसंख्या मोजताना, त्यावेळी धरली जाईल. सभासदांनी सभेच्या नमूद वेळेच्या १० मिनिटे आधी उपस्थितीसाठी लॉगईन करावे.

२. सभासदास अहवाल, ताळेबंद वगैरेसंबंधी काही माहिती पाहिजे असल्यास तो त्यांना सुट्टी व्यतिरिक्त इतर दिवशी कार्यालयीन वेळेमध्ये पहावयास मिळेल.

## विशेष सूचना :

१. काही अपवादात्मक परिस्थितीत उदा. तांत्रिक कारणांमुळे सदर वार्षिक सर्वसाधारण सभेचे कामकाज खंडीत झाल्यास, तांत्रिक त्रूटीचे निवारण झाल्यानंतर त्याच लिंकवर लगेचच सभेचे कामकाज पुढे सुरु केले जाईल, याची सभासदांनी नोंद घ्यावी.

२. सभासदांना सभेमध्ये विधायक स्वरुपाचे प्रश्न विचारावयाचे असतील ते त्यांनी दि. २४/०३/२०२१ पर्यंत कारखान्याचे कार्यालयात कृपया लेखी द्यावेत. अथवा shriramsakhar@gmail.com या मेलवर उपरोक्त कालावधीत सभासद क्रमांक व संपूर्ण नांव नमूद करुन पाठवावेत, सभेच्या विषय पत्रिकेतील विषयांबाबत प्रश्न विचारात घेतले जातील.

३. दै. ऐक्य सातारा या वृत्तपत्रामध्ये दि. १०/३/२०२१ रोजी प्रसिध्द केलेल्या सुचनेनुसार ज्या सभासदांनी मोबाईल क्रमांक नोंद केले आहेत त्यावर दि. २५ मार्च २०२१ पूर्वी एसएमएस / ई मेल आयडी द्वारे लॉगईन आयडी आणि पासवर्ड पाठविण्यात येईल.

४. संगणक / लॅपटॉप / स्मार्टफोन याद्वारे ज्या सभासदांकडे इंटरनेट सेवा उपलब्ध असेल, असे सभासद या सभेमध्ये ह्या वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित राहू शकतील.

५. सभासदांनी सभेपूर्वी किंवा सभा चालू असताना कोणत्याही तांत्रिक मदतीची गरज भासल्यास किंवा तांत्रिक अडचणी आल्यास shriramsakhar@gmail.com या मेल आयडीवर अथवा कारखान्याच्या मुख्य कार्यालयाशी संपर्क साधावा. सभासदांच्या वैयक्तिक इंटरनेट कनेक्शनबाबत काही अडचणी असतील तर त्या सोडविणे कारखान्यास शक्य होणार नाही.

प्रति,

मा.श्री. ______________________

मु.पो. ______________________

ता.फलटण, जि.सातारा

**पाठविणार : श्रीराम सहकारी साखर कारखाना लि., फलटण, जि.सातारा**